*Indian Streams Reserach Journal*
*Vol.2,Issue.I/ Feb; 12pp.1-4*
श्रीमती चोपडे अर्चना बाबासाहेब
**ISSN:-2230-7850**

**Research Papers**

# कमी बौध्दिक क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्ययनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास

**श्रीमती चोपडे अर्चना बाबासाहेब**
सहा.कुलसचिव,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## प्रस्तावना :–

शालेय स्तर हा जीवनाचा जडणघडणीचा काळ असतो. शालेय स्तरावर मिळविलेले ज्ञान, कमावलेले शरीर, संपादन केलेले यश, हस्तगत केलेली कौशल्ये ही आपणाला जीवनभर उपयोगी पडतात. परंतू सर्वच व्यक्तींची बौध्दिक पातळी ही सारखी नसते. प्रत्येक विद्यार्थी हा कमी अधिक बुध्दिमत्तेचा असतो. कमी बौध्दिक क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्ययनात अनेक समस्या येतात.

अशा मुलांना उत्तरे लिहिण्यात अडचणी येतात. शिकविलेले समजत नाही, कवितेच्या प्रश्नांची उत्तरे लिहिता येत नाहीत, शुध्दलेखनात समस्या येतात. तसेच इंग्रजी, गणित सारखे विषय अवघड वाटतात. अशा मुलांच्या समस्या जाणून घेणे गरजेचे आहे. पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनीमध्ये डॉ.सौ.उषा खिरे यांच्या कसोटीनुसार ज्यांचा बुध्यांक 80 ते 89 च्या दरम्यान आहे, असे विद्यार्थी म्हणजे कमी बौध्दिक क्षमतेचे विद्यार्थी या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन अशा विद्यार्थ्यांना अध्ययनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. बहुतांश विद्यार्थ्यांना शिक्षकांनी शिकविलेले समजत नाही. कवितेचा अर्थ कळत नाही, कवितेचे उत्तर लिहिताना शब्दभांडार कमी पडते, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देता येत नाहीत, अध्ययन विषयक अनेक समस्या येतात. (1) 93.75 टक्के शिक्षकांच्या मते वर्गामध्ये कमी बौध्दिक क्षमतेचे विद्यार्थी असतात. (2) 68.70 टक्के शिक्षकांच्या मते अशा मुलांना विविध समस्या येतात. (3) 100 टक्के शिक्षकांच्या मते या मुलांच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्यासाठी वेगळे उपक्रम राबविले जात नाहीत. (4) 68.75 टक्के शिक्षकांच्या मते ही मुले कार्यक्रमामध्ये (शालेय) सहभागी होत नाहीत.

टक्केवारी या साधनाचा वापर करून प्रश्नावलीवरून निष्कर्ष काढण्यात आले. (1) प्रत्येक वर्गात कमी बौध्दिक क्षमतेचे विद्यार्थी असतात. (2) त्यांना उत्तरे लिहितांना शब्दभांडार कमी पडते. (3) कविता अवघड वाटतात. (4) शब्दकोडी, गणिते समजत नाहीत. (5) शैक्षणिक समस्या येतात.

### संशोधनाची गरज :–

कमी बौध्दिक क्षमतेच्या विद्यार्थ्यांना चांगले अध्यापन करून देखील मुलांना अडचणी निर्माण होतात. या मुलांना नक्की कोणत्या अडचणी निर्माण होतात व त्या कशा प्रकारे सोडविता येतील, याचा उपयोग शिक्षक व पालकांना मार्गदर्शक म्हणून हे संशोधन उपयुक्त आहे. वर्गामध्ये शिक्षक हे सर्वसाधारणपणे सर्वसामान्य बुध्दिमत्तेच्या मुलांचा विचार करून अध्यापन करतात, परंतू कमी बौध्दिक क्षमता असणाऱ्या मुलांचा शोध घेऊन या विद्यार्थ्यांसाठी वेगळे अध्यापन करणे गरजेचे आहे. अभ्यासविषयक भिती दूर केली पाहिजे. विद्यार्थ्यांना अध्ययनात रूची वाटावी यासाठी काठिण्य पातळीच्या अभ्यासक्रमासाठी दृक–श्राव्य साधनांचा वापर करणे व अशा विद्यार्थ्यांच्या समस्या दूर करण्यासाठी हे संशोधन गरजेचे आहे.

### महत्व :–

शिक्षण गतिमान करण्यासाठी व कमी बौध्दिक क्षमतेच्या विद्यार्थ्यांना सर्वसामान्यांच्या कक्षेत आणण्यासाठी शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी अशा मुलांकडे विशेष लक्ष देऊन व योग्य उपक्रम राबवून शिक्षक व मुख्याध्यापकांना याविषयी जाणीव होण्यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे.

पालकांना आपल्या पाल्यांच्या अध्ययनातील समस्यांची जाणीव होऊन त्या समस्या कमी करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

या संशोधनामुळे विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेचा शोध शिक्षक घेऊ शकतील व कमी बौध्दिक क्षमतेच्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन विषयक समस्या शिक्षकांना, मुख्याध्यापकांना समजून घेऊन या मुलांना योग्य मार्गदर्शन, प्रेरणा व योग्य उपक्रमांद्वारे मदत होऊ शकते म्हणून हे संशोधन महत्वाचे आहे.

### उद्दिष्टे :–

1) सरासरी बौध्दिक क्षमतेपेक्षा कमी बौध्दिक क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांचा बुध्दिमापन कसोटीच्या आधारे शोध घेणे.
2) सरासरी बौध्दिक क्षमतेपेक्षा कमी बुध्दिमत्ता असणाऱ्या

**Please cite this Article as :** *श्रीमती चोपडे अर्चना बाबासाहेब ` ,कमी बौध्दिक क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्ययनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास* **: Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.I/ Feb; 2012

विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील समस्या अभ्यासणे.

3) कमी बुध्दिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

*व्याप्ती व मर्यादा :–*

भोर शहरातील चार शाळांमधील इयत्ता नववीमध्ये शिकत असणारी सरासरी बौध्दिक क्षमतेपेक्षा कमी बुध्दिमत्ता असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या केवळ अध्ययन समस्यांची माहिती संकलित केली आहे.

*संशोधन पध्दती :–*

संशोधकाने निवड केलेल्या समस्येचे स्वरूप, गरज, महत्व, उद्दिष्टे, व्याप्ती व मर्यादा विचारात घेऊन या समस्येची सोडवणूक करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

*साधने व तंत्रे :–*

संशोधन समस्येच्या माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली या साधन तंत्राचा वापर केला आहे.

नमुना निवड :–

भोर शहरात माध्यमिक शाळांची संख्या आठ (8) आहे. यापैकी चार (4) शाळांमधील 40 विद्यार्थी व 16 शिक्षकांनी माहितीसाठी प्रतिसाद दिला आहे.

*संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :–*

प्रस्तुत संशोधनासाठी चार प्राथमिक शाळांमधील सोळा (16) शिक्षकांनी प्रतिसाद दिला. तसेच चार शाळांमधील चाळीस(40) विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. विद्यार्थी व शिक्षकांना प्रश्नावली देऊन भरून घेतली. प्रत्येक प्रश्नांचे कोष्टक तयार करण्यांत आले. प्रतिसादाचे शेकडा प्रमाण काढण्यात आले. प्रत्येक प्रश्नाच्या तयार झालेल्या कोष्टकावरून विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले. उपलब्ध माहितीचा आधार घेऊन माहितीचा वस्तुनिष्ठ अर्थ लावण्यात आलेला आहे.

*निष्कर्ष :–*

1) 60% विद्यार्थ्यांना शिकविलेले समजत नाही.

2) 62.5% विद्यार्थ्यांच्या मते कवितेतील अवघड शब्दांचे अर्थ समजत नाहीत.

3) 70% विद्यार्थ्यांच्या मते शिक्षक पुनर्रअध्यापन करत नाहीत.

4) 55% विद्यार्थी वर्गात शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत नाहीत.

5) 67% विद्यार्थ्यांच्या मते शुध्दलेखनात अडचणी येतात.

6) 37.5% विद्यार्थ्यांच्या मते अभ्यासाबाबत शिक्षकांकडून मार्गदर्शन मिळत नाही, तर 62.5: विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून मार्गदर्शन मिळते.

7) 87.5% विद्यार्थ्यांना पालकांकडून अध्ययन विषयक साहित्य मिळते.

8) शाळेमध्ये काही विषयांसाठी जादा तासांचे आयोजन केले जाते असे 65.5% विद्यार्थ्यांचे मत आहे.

9) 93.75% शिक्षकांच्या मते वर्गामध्ये कमी बौध्दिक क्षमतेचे विद्यार्थी आहेत.

10) 56.25% शिक्षकांच्या मते विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान करणे शक्य होत नाही.

11) 68.70% शिक्षकांच्या मते कमी बौध्दिक क्षमतांच्या मुलांना विविध शैक्षणिक समस्या येतात.

12) 56.25% शिक्षकांच्या मते कमी बौध्दिक क्षमतांच्या विद्यार्थ्यांना अध्ययन विषयक समस्या येतात.

13) 100% शिक्षकांच्या मते कमी बौध्दिक क्षमता असणारे विद्यार्थी अभ्यासात तयार होण्यासाठी शिक्षक प्रयत्न करतात

14) 50% शिक्षकांच्या मते शब्द भांडार कमी असल्याने विद्यार्थ्यांना लिहिता येत नाही तर 37.5% शिक्षकांच्या मते विद्यार्थ्यांचे पाठांतर नसल्याने उत्तरे लिहिता येत नाहीत.

*शिफारशी :*

1) विद्यार्थ्यांच्या समस्या शिक्षकांनी आणि पालकांनी जाणून सोडवाव्यात.

2) एखादा घटक शिकविताना विद्यार्थ्यांना समजला नसेल तर पुनर्रअध्यापन करावे.

3) विद्यार्थ्यांचे शब्दभांडार वाढविण्यासाठी शाळेमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करावे उदा.शब्दकोडी, उखाणे, शब्दांच्या भेंड्या इ.

4) शुध्दलेखनात विद्यार्थ्यांच्या अडचणी कमी होण्यासाठी व्याकरणाचे तास वाढवून ऱ्हस्व, दिर्घ, वेलांटी याबाबत मार्गदर्शन करावे.

5) ग्रंथालयातून विषयांशी संबंधित पुस्तकांबरोबरच पूरक वचनासाठी पुस्तके दिली जावीत.

6) विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या अध्यापनात रूची वाटावी यासाठी शिक्षकांनी त्यांच्या अध्यापनात दृक–श्राव्य साधनांचा वापर करावा.

7) शिक्षकांनी कमी बौध्दिक क्षमतेच्या विद्यार्थ्यांच्या गतीनेदेखील अभ्यासक्रम पूर्ण करावा.

8) अध्यापनात विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग घ्यावा.

9) विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे समाधान करावे व त्यासाठी योग्य ते मार्गदर्शन, सहकार्य करावे.

*संदर्भ ग्रंथ सूची :*

1) कदम चा.प.(1999).शैक्षणिक संख्याशास्त्र, (द्वितीय आवृत्ती) नूतन प्रकाशन, पुणे.
2) खरात आ.पा.(1992).प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र,(तृतीय आवृत्ती)श्री.विद्या प्रकाशन, पुणे.
3) पंडित बन्सी बिहारी (1997) शिक्षणातील संशोधन (प्रथमावृत्ती)नूतन प्रकाशन, पुणे.
4) भालेराव विवेक(जून2003). बुध्दिमत्तेत अनुवंशिकतेचा भाग किती?शिक्षण संक्रमण
5) भिंताडे वि.रा.(2004). शैक्षणिक संशोधन पध्दती (प्रतिरूप आवृत्ती)नूतन प्रकाशन,पुणे
6) डॉ.जगताप ह.ना.–शिक्षणातील नवविचार प्रवाह व नवप्रवर्तन (प्रथमावृत्ती 1992)
7) सप्तरंग सकाळ (15 जानेवारी, 2008) गतिमंदता म्हणजे काय?

**Please cite this Article as :** *श्रीमती चोपडे अर्चना बाबासाहेब `,कमी बौध्दिक क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्ययनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास* **: Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**